## Criterion 7 – Institutional Values and Best Practices

**7.1.9 Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

| Sr. No. | Program | Date |
|---|---|---|
| 1 | World Anti-Drug Day | 26-06-2023 |
| 2 | Voter Awareness Program | 14-07-2023 |
| 3 | Disaster Management Workshop | 04-08-2023 |
| 4 | Voters Awareness Program | 05-08-2023 |
| 5 | "Meri Mitti Mera Desh" Oath | 10-08-2023 |
| 6 | International Youth Day | 12-08-2023 |
| 7 | Establishment of Red Ribbon Club | 14-08-2023 |
| 8 | Meri Mati Mera Desh | 13-09-2023 |
| 9 | Tree Plantation | 18-09-2023 |
| 10 | Gandhi Vichar Sanskar Pariksha | 12-10-2023 |
| 11 | Ekta Daud | 31-10-2023 |
| 12 | World AIDS Day | 04-12-2023 |
| 13 | National Education Policy 2020: Theme and Prospects | 09-01-2024 |
| 14 | National Voters' Day | 25-01-2024 |
| 15 | Disaster Management Workshop | 18-03-2024 |
| 16 | Intellectual Property Rights | 28-03-2024 |
| 17 | Voting Rights and Responsibility | 04-04-2024 |
| 18 | Tarikha Tera Matadan Mera | 09-05-2024 |

## Glimpses of Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens

### 1. World Anti-Drug Day




**Program Dated: 01-07-2023**

### 2. Voter Awareness Program

Voting rights are important in democracy. On the occasion of voter awareness program in college, Principal Dr. J.B. Anjane guided the newly admitted students about voting and how it is important in democracy. They said, in the democratic process everyone has to follow their rights and duties while distributing voter registration forms to the students. Employees of Raver Tehsil Office were also present. The right to vote is one of the most important of all rights. But, for that it is necessary to register your name in the voter list said Raver Tehsildar Bandu Kapse to the students. Mr. Hemant Baviskar conducted this program successfully.



लोकशाही

**मतदार यादीत नोंदणी करणे आवश्यक**

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृती निमित्ताने प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी लोकशाहीत मतदान करणे खुप महत्वाचे असते म्हणून सर्वांनी मतदार यादीत आपल्या नांवाची नोंदणी करणे आवश्यक आहे असे आवाहन केले. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेला आपला देश आहे. आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे मतदान प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. या प्रसंगी मतदार नोंदणी फॉर्म चे वाटप नवमतदारांना करण्यात आले. सदर कार्यक्रमाला मा. तहसीलदार बंडू कापसे व नायब तहसीलदार आर. डी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच रावेर तहसील कार्यालयातील कर्मचारी विक्रम राठोड व सुलेमान तडवी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बाविस्कर यांनी केले.

Lokshahi Edition
Jul 15, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver, Dist- Jalgaon

**Program Dated: 14-07-2023**

## 3. Disaster Management Workshop

A disaster management workshop was organized at college. The inauguration was done by Tehsildar Bandu Kapse. He gave information about disaster and its types in question and answer session. Presided over by Principal Dr. J.B. Anjane. In the first part of this workshop, District Disaster Management Officer Narvir Singh Rawal gave information about life jackets along with demonstrations. Later in the session Dr. Prashant Waghmare presented information on how to manage disaster, its causes. How is the lifeboat in the third season? Information about how it works. Disaster Management Officer Narveer Singh Rawal gave information in the workshop with demonstrations. Principal Dr. Anjane gave information about disaster management and its work.

दिव्य मराठी **भुसावळ 05-08-2023**

**प्रात्यक्षिकातून आपत्ती व्यवस्थापनाचे धडे; ऐनपूरला तीन सत्रात प्रशिक्षण**

प्रतिनिधी | ऐनपूर

ऐनपूर (ता.रावेर) येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन केले होते. उद्घाटन तहसीलदार बंडू कापसे यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपत्ती व तिचे प्रकार यावर प्रश्नोत्तरे स्वरूपात माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने होते.

या कार्यशाळेच्या प्रथम भागात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नरविरसिंग रावळ यांनी लाईफ जॅकिटविषयी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. नंतर सत्रात डॉ.प्रशांत वाघमारे यांनी आपत्ती व्यवस्थापन कसे करावे, त्याची कारणे याविषयीची माहिती सादर केली. तिसऱ्या सत्रात लाईफ बोट कशी असते? तिचे कार्य कशा पद्धतीने होते याविषयीची माहिती



कार्यशाळेत माहिती देताना आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नरवीरसिंग रावळ

प्रात्यक्षिकांसह देण्यात आली. प्राचार्य डॉ.अंजने यांनी आपत्ती व्यवस्थापन व त्यांचे कार्य याविषयी माहिती दिली. प्रमूख पाहुणे म्हणून अपर तहसीलदार मयूर कडसे, निवासी नायब तहसीलदार संजय तायडे हे उपस्थित होते. मंडळ अधिकारी शेलकर, विजय सिरसाट, प्रवीण पाटील, महसूल सहाय्यक नयना अवसरमल, अनिल आसेकर, हर्षल पाटील, श्रेयस पाटील, नितीन महाजन, गोपाल पाटील यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन हेमंत बाविस्कर, तर आभार डॉ.एस.एन.वैष्णव यांनी मानले.

**Program Dated: 04-08-2023**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 4. Voters Awareness Program

Voting awareness campaign and workshop organized in College. Shri Mandal Officer Shri Shelkar inaugurated the voter awareness campaign workshop and guided the new voters. On this occasion, BAL Shri Ashish Sir asserted that voters are an important element of the country, youths should come forward and register their names in the voter list. Kotwal of Ainpur village on this occasion Smt. Nayana Vasaramal was present. Prof. Dr. Satish Vaishnav urged everyone to register their names in the electoral roll as voting is very important in a democracy. On this occasion Voter registration forms were distributed to new voters.

रविवार दि.६-८-२०२३

### ऐनपूर महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान व कार्यशाळा संपन्न

ऐनपूर -येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान कार्यशाळेचे उद्घाटन श्री मंडळ अधिकारी श्री शेलकर यांनी केले . व नवमतदारांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी बीएल श्री आशिष सर यांनी मतदार हा देशाचा महत्वाचा घटक आहे,तरुणांनी पुढे येऊन मतदार यादीत आपल्या नावाची नोंदणी करुन घ्यावी असे प्रतिपादन केले.या प्रसंगी ऐनपूर गावाच्या कोतवाल नयना अवसरमल व पत्रकार अनिल आसेकर हे ही उपस्थित होते. प्रा. डॉ सतीष वैष्णव यांनी लोकशाहीत मतदान करणे खुप महत्वाचे असते म्हणून सर्वांनी मतदार यादीत आपल्या नांवाची नोंदणी करणे आवश्यक आहे असे आवाहन केले.जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेला आपला देश आहे. आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे मतदान प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे.या प्रसंगी मतदार नोंदणी फॉर्म चे वाटप नवमतदारांना करण्यात आले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ एस एन वैष्णव हे होते सदर कार्यक्रमाला मा.तहसीलदार श्री बंडू कापसे ,नायब तहसीलदार श्री आर. डी. पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच रावेर तहसील कार्यालयातील कर्मचारी विक्रम राठोड व सुलेमान तडवी यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नोडल अधिकारी प्रा हेमंत बाविस्कर यांनी केले.

### ऐनपूर महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यशाळेचे उद्घाटन

ऐनपूर, ता. रावेर : येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान कार्यशाळेचे उद्घाटन मंडळ अधिकारी जी. एम. शेलकर यांनी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. एन. वैष्णव होते. कार्यक्रमाला तहसीलदार बंडू कापसे, नायब तहसीलदार आर. डी. पाटील व प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांचे मार्गदर्शन लाभले. या वेळी शेलकर यांनी नव मतदारांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी बीएलओ आशिष यांनी मतदार हा देशाचा महत्वाचा घटक आहे, तरुणांनी पुढे येऊन मतदार यादीत आपल्या नावाची नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन केले. या प्रसंगी कोतवाल नयना अवसरमल, पत्रकार अनिल आसेकर उपस्थित होते. प्रा.डॉ. सतीष वैष्णव यांनी लोकशाहीत मतदान करणे महत्वाचे असून सर्वांनी मतदार यादीत नावाची नोंदणी करावी, असे आवाहन केले. या प्रसंगी नवमतदारांना मतदार नोंदणी फॉर्मचे वाटप करण्यात आले. रावेर तहसील कार्यालयातील कर्मचारी विक्रम राठोड व सुलेमान तडवी यांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले. सूत्रसंचालन नोडल अधिकारी प्रा. हेमंत बाविस्कर यांनी केले.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 05-08-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 5. "Meri Mitti Mera Desh" Oath

Panchapran oath was taken by the National Service Scheme Unit in the College under the initiative 'Meri Mitti, Mera Desh' in celebration of World Tribal Day and August Revolution Day.

लोकमत

### ऐनपूरला विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**ऐनपूर, ता. रावेर :** येथील स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककतर्फे जागतिक आदिवासी दिवस व ऑगस्ट क्रांती दिवसाचे औचित्य साधून 'मेरी मिट्टी, मेरा देश' या उपक्रमांतर्गत पंचप्रणची शपथ घेण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. पी. पाटील व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी दीपाशा गुरव आदी उपस्थित होते. या उपक्रमात रासेयो स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

Hello Bhusaval
Page No. 3 Aug 11, 2023
Powered by: erelego.com

**Program Dated: 10-08-2023**

Sardar V.P Arts & Sci. College
AINPUR
Pin
425507
Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 6. International Youth Day

By the National Service Scheme Unit of College International Youth Day was celebrated on August 12, 2023. The program was presided by Head of Chemistry Department and I.Q.A.C. Coordinator Dr. S. N. Vaishnav. Keynote speaker, NSS Program Officer Dr. D. B. Patil said, if Youth is wise a country will become wise, also opined that the development of an individual is through internal motivation while the development of a nation is through unity. In the presidential speech, Dr. S. N. Vaishnav explained the historical background of International Youth Day.

The program was coordinated by Women Program Officer Dr. Rekha Patil. Vote of thank by NSS Student representative Dipasha Gurav.

दैनिक **लोकशाही**

# ऐनपूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता. रावेर** प्रतिनिधी



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दि. १२ ऑगस्ट या दिवशी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायन शास्त्र विभागप्रमुख तथा आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एस. एन. वैष्णव हे होते. प्रमुख वक्ते म्हणून रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी मार्गदर्शन करतांना, युवा सुज्ञ असतील तर देश सुज्ञ होईल, तसेच व्यक्तीचा विकास आंतरिक प्रेरणेने होतो तर राष्ट्राचा विकास एकात्मतेने होतो असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. एन. वैष्णव यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील यांनी तर आभार रा. से. यो. विद्यार्थी प्रतिनिधी दिपाषा गुरव हिने मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील, तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Lokshahi Edition
Aug 15, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 12-08-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver, Dist- Jalgaon

## 7. Establishment of Red Ribbon Club

Red Ribbon Club was established to create awareness about AIDS in the society. On this occasion, Rural Hospital Pal. C. T. C. Consultant Mr. Vishwas Patil was present as the inaugural function. He taught the students about pregnant mothers, gynecological diseases, AIDS, A. R. T. medication. Also cleared the doubts in the mind of the students about spread and prevention of HIV.

दैनिक **लोकशाही**

# ऐनपूर महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर टा. रावेर** प्रतिनिधी



स. व. प. कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे समाजात एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. यानिमित्ताने ग्रामीण रुग्णालय पाल येथील आय. सी. टी. सी. सल्लागार श्री. विश्वास पाटील हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना गरोदर माता, गुप्तरोग, एड्स, ए. आर. टी. औषधोपचार याविषयी मार्गदर्शन केले. तसेच एच. आय. व्ही. प्रसार व प्रतिबंध याविषयी विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी तर डॉ. रेखा पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Lokshahi Edition
Aug 15, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

**Program Dated: 14-08-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

## 8. Meri Mati Mera Desh

दैनिक **लोकशाही**

# आजचा तरुण हा उद्याचा भारत : प्राचार्य डॉ. अंजने

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता रावेर** प्रतिनिधी



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील ऐनपूर येथे आज दिनांक १३ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे होते. तसेच माजी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. पी. नेहेते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. बी. पाटील व डॉ. एस. बी. पाटील तसेच महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व महाविद्यालयातील प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मेरी माटी मेरा देश ही संकल्पना राबविताना प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने तसेच उपस्थित मान्यवरांनी अमृत कलश यामध्ये माती टाकून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. बी. पाटील यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये त्यांनी मेरी माटी मेरा देश या उपक्रमाविषयीची माहिती विषद केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी आजचा तरुण हा उद्याचा भारत आहे असे सांगून सर्व स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा. से. यो. विद्यार्थी प्रतिनिधी कु. दीपाशा गुरव हिने केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एस. बी. पाटील यांनी केले.

Lokshahi Edition
Sep 14, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**Program Dated: 13-09-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 9. Tree Plantation

NSS unit of college organized tree plantation program in college campus. By the auspicious hand of our institute chairman Hon. Shri. Shriram Narayan Patil some tree were planted. NSS program officer Dr. Dipak Patil, Dr. Rekha Patil and assistant program officer Dr. S. B. Patil successfully conducted this program.

दैनिक लोकशाही

### ऐनपूर महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी



येथील ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन मा.श्रीराम नारायण पाटील यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे आयोजीत या वृक्षारोपण कार्यक्रमास रासेयो. रावेर विभागीय समन्वयक डॉ. जे. पी. नेहेते, रासयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील तसेच डॉ. एस. ए. पाटील, क्रीडा संचालक प्रा. सचिन झोपे, प्रमोद पाटील, गोपाल महाजन, अनिकेत पाटील, श्रेयस पाटील तसेच रा. से. यो. स्वयंसेवक मोठया संखेने उपस्थित होते. या वृक्षारोपण कार्यक्रमात बेल, बकुळ, पिंपळ ई. वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

Lokshahi Edition
Sep 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**Program Dated: 18-09-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 10. Gandhi Vichar Sanskar Pariksha

लोकशाही

**थोडक्यात**

### ऐनपूर महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा



लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी

दि. १२ ऑक्टोबर रोजी ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव तर्फे गांधी विचार संस्कार परीक्षा २०२३ चे आयोजन करण्यात आले. या परीक्षेत महाविद्यालयातील ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे संचालक एन. व्ही. पाटील यांनी परीक्षा केंद्रावर भेट दिली. परीक्षेचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. पी. आर. गवळी यांनी काम बघितले. परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून प्रा. डी. ए. कोळी व प्रा. अक्षय महाजन यांनी कार्य केले. प्रा प्रदिप तायडे, प्रा नरेंद्र मुळे व शिक्षकेतर कर्मचारी श्रेयस पाटील यांनी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

Gandhi Vichar Sanskar Exam 2023 was organized by Gandhi Research Foundation Jalgaon at college. 46 students of the college participated in this examination. Principal of the college Dr. J. B. Anjane guided. Director of the organization N. V. Patil visited the examination center.

**Program Dated: 12-10-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 11. Ekta Daud

By the National Service Scheme Unit Sardar Patel Jayanti was celebrated on 31 October 2023. All present took oath of unity on the occasion of Ekta Diwas. After that "Ekta Daud" was organized.




दैनिक **लोकशाही**




# ऐनपूर महाविद्यालयात एकता दौड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता रावेर** प्रतिनिधी

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दि. ३१ ऑक्टोबर २०२३ या दिवशी सरदार पटेल जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. उपस्थित सर्वांनी एकता दिवसाच्या निमित्ताने एकात्मतेची शपथ घेतली. त्यांनंतर 'एकता दौड चे आयोजन करण्यात आले. यात उपस्थित सर्व प्राध्यापक, प्रध्यापाकेतर कर्मचारी व रा. से. यो. स्वयंसेवक यांनी सहभाग नोंदविला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनाचे विभागीय समन्वयक डॉ. जयंत नेहेते तसेच रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक, प्रध्यापाकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

Lokshahi Edition
Nov 1, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 31-10-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 12. World AIDS Day

In college lecture was organized on the occasion of World AIDS Day. The program was chaired by the principal of the college Dr. J. B. Anjane.

Raver college professor Dr. G. R. Dhembare guided the volunteers of the National Service Scheme. He told in his speech that the AIDS disease spread from South Africa to the whole world. The disease was created an atmosphere of fear throughout the world. Many misconceptions about the disease are cleared due to the awareness raised by the volunteers of various voluntary organizations.

# ऐनपूर महाविद्यालयात एड्स दिनानिमित्त व्याख्यान

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयांमध्ये जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने हे उपस्थित होते.

व्याख्यानमालेत रावेर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. जी. आर. ढेंबरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, एड्स आजार दक्षिण आफ्रिकेतून जगभर पसरला. संपूर्ण जगामध्ये या रोगाने भीतीचे वातावरण तयार केले. विविध स्वयंसेवी संघटना, रासेयोचे स्वयंसेवकांनी केलेल्या जाणीव जागृतीमुळे या आजाराविषयीचे अनेक भ्रम समाजातून दूर झाले.

उपस्थित स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना देतांना आर. आर. सी. क्लब अंतर्गत सदर कार्यक्रमाचे आयोजन केले असून सर्वांनी एड्स जनजागृती साठी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे दुसरे वक्ते ग्रामीण रुग्णालय पाल येथील आय. सी. टी. सी. सल्लागार विश्वास पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स या रोगाविषयीची सविस्तर माहिती दिली. हा रोग कसा होतो? रोगापासून बचाव कसा करावा या विषयी माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी त्यांच्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना 'माहिती हीच शक्ती' असून एड्स या रोगाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमास रा. से. यो. स्वयंसेवक तसेच प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 04-12-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 13. National Education Policy 2020: Theme and Prospects

Seminar on "**National Education Policy 2020: Theme and Prospects**" was organized in College. Financial assistance was provided by Kavayitri Bahinabai Chaudhary, North Maharashtra University, Jalgaon. Dr. Shyam Jeevan Salunkhe, Appasaheb Raghunath Baburao (Garuda College of Arts, Commerce and Science, Shaindurni) were present as key guides for the National Education Policy Seminar programme. They elaborated on the New Education Policy: 2020 in their lecture. The policy aims to restructure India's education system to make it more modern, effective and inclusive and transform India into a knowledge and skill rich nation.



दैनिक लोकशाही

epaper.lokshahilive.com
10 Jan 2024 - Page 6

# ऐनपूर महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर ✍ प्रतिनिधी

येथील ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण:२०२०

(पान २ वर)



दैनिक लोकशाही

epaper.lokshahilive.com
10 Jan 2024 - Page 2

२ जळगाव, बुधवार दि.१० जानेवारी २०२४

पान ६ वरून

# ऐनपूर महाविद्यालयात...

परिसंवाद आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले. सदर परिसंवादाच्या उद्घाटनाच्या कार्याक्रमाचे अध्यक्षस्थान भागवत विश्वनाथ पाटील(अध्यक्ष, ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ) यांनी भूषविले. व्यासपीठावर श्रीराम नारायण पाटील (चेअरमन) रामदास नारायण महाजन(उपाध्यक्ष) संजय वामन पाटील (सचिव) तसेच सर्व सदस्य आणि महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य आणि प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने उपस्थित होते. सुरवातीला व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांनी दीपप्रज्वलन आणि लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण परिसंवाद कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ श्याम जीवन साळुंखे, अप्पासाहेब रघुनाथ बाबुराव (गरुड कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय,शैन्दुर्णी) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. श्याम जीवन साळुंखे यांचा परिचय डॉ. सतीश ए. पाटील यांनी करून दिला. त्यानंतर प्रा. श्याम जीवन साळुंखे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: तत्व आणि संभावना या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात नवीन शैक्षणिक धोरण:२०२० विस्तृतपणे सांगितले. या धोरणाचा उद्देश भारतातील शिक्षण प्रणालीला पुनर्रचीत करून ती अधिक आधुनिक, प्रभावी आणि सर्वसमावेशक बनवणे तसेच भारताला ज्ञान आणि कौशल्य प्रचंड असलेल्या राष्ट्रामध्ये रूपांतरित करणे व भारताला एक ज्ञानप्रधान आणि कौशल्यपूर्ण समाज बनवणे हा आहे असे सांगितले.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक उपस्थित होते. त्यानंतर उपस्थितांशी हितगूज करतांना त्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. त्यानंतर प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासन आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या कल्पना,उद्दिष्टे आणि अंमलबजावणी याबद्दल जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे असे सांगितले. रामदास महाजन, (उपाध्यक्ष, ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ) यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० हे भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जे भारतातील शिक्षणाला नवीन दिशा देणारे आहे असे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. एस. बी. पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सतीश एन. वैष्णव यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. हेमंत बाविस्कर, प्रा. संजय महाजन, डॉ. जयंत नेहेते, प्रा. प्रवीण महाजन, प्रा. सुनील इंगळे, प्रा. रामटेके, प्रा. मुळे, प्रा. तायडे, प्रा कोळी आणि सर्व प्राध्यपक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले



Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**Program Dated: 09-01-2024**

## 14. National Voters' Day

January 25 was celebrated as Voter's Day in College. The program was presided over by Principal Dr JB Anjane. In the presidential address, Principal Dr JB Anjane appealed that everyone should register their name in the electoral roll as voting is very important in a democracy. Our country is the largest democracy in the world. In order to strengthen our country's democracy, everyone should participate honestly in the voting process. On this occasion Prof. Hemant Baviskar took oath with students on the occasion of Voter's Day.

### मतदार यादीत नांव नोंदणी करणे आवश्यक : प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर ✍ प्रतिनिधी



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात २५ जानेवारी मतदार दिवस म्हणुन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ जे बी अंजने होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी लोकशाहीत मतदान करणे खुप महत्वाचे असते म्हणून सर्वांनी मतदार यादीत आपल्या नांवाची नोंदणी करणे आवश्यक आहे असे आवाहन केले. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेला आपला देश आहे. आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे मतदान प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. यावेळी प्रा हेमंत बाविस्कर यांनी मतदार दिनानिमित्त शपथ दिली. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ सतिश वैष्णव, डॉ जे पी नेहते, प्रा एस बी महाजन, प्रा व्ही एच पाटील, प्रा एस पी उमरीवाड, डॉ रामटेक, डॉ मुळे, डॉ प्रवीण महाजन, प्रा इंगळे, प्रा तायडे, डॉ एम के सोनवणे, ऋषीकेश महाजन, हर्षल पाटील, गोपाल पाटील, नितीन महाजन, (पान २ वर)

### ऐनपूर महाविद्यालयात मतदार दिवस साजरा

प्रतिनिधी | ऐनपूर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात नुकताच मतदार दिवस उत्साहात साजरा झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने होते. लोकशाहीत मतदान करणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे सर्वांनी मतदार यादीत आपल्या नावाची नोंदणी करावी, असे आवाहन केले. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेला आपला देश असून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे मतदान प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी प्रा.हेमंत बाविस्कर यांनी मतदार दिनानिमित्त सर्वांना शपथ दिली. उपप्राचार्य डॉ.सतीश वैष्णव, डॉ.जे.पी. नेहते, प्रा.एस.बी. महाजन, प्रा.व्ही.एच. पाटील, प्रा.एस.पी. उमरीवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बाविस्कर यांनी केले तर आभार डॉ.वैष्णव यांनी मानले

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 25-01-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 15. Disaster Management Workshop

# ऐनपूर महाविद्यालयात कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



ऐनपूर, ता. रावेर : येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभागामार्फत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आयोजित केले होते. यात प्रशिक्षक म्हणून नायगाव येथील प्रतिभा फायर सर्विसेसचे उत्तम प्रधान यांनी आपत्कालीन परिस्थितीसह आग व इतर ज्वलनशील परिस्थिती कशी हाताळावी तसेच अग्नीशमनसाठी उपयोगी असणारी उपकरणे कशी हाताळावीत, याबाबत माहिती दिली. तसेच आग कशी विझवावी याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन ही केले. हे प्रशिक्षण प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनात झाले. कार्यशाळेचे आयोजन ग्रंथालय विभागाचे प्रा.डॉ. संदीप साळुंके यांनी केले होते. कार्यक्रमात प्रा. ज्ञानेश्वर कोळी, गोपाल महाजन, श्रीराम चौधरी, प्रवीण महाजन, महेंद्र महाजन, भास्कर पाटील, हर्षल पाटील, श्रेयस पाटील, अनुज पाटील, ऋषी महाजन, नितीन महाजन, गोपाल पाटील यांनी सहभाग नोंदवला.

Smart Jalgaon Edition
Mar 19, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

**Program Dated: 18-03-2024**

Sardar V.P. Arts & Science College ★ AINPUR Pin 425507 ★ Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 16. Intellectual Property Rights

The seminar organized by the IQAC, to inform the students about, what is Intellectual Property Rights? How to register a patent directly? Dr. Satish Vaishnav gave information on the relevance and scope of intellectual property rights. In the second session, Prof. Dr. D.B. Patil gave information about intellectual property and trade mark. Information about trade mark, trade secret, patent and trademark, actual patent registration is given.

In the concluding session there was a question and answer session.

दिव्य मराठी

भुसावळ 29-03-2024

# ‘बौद्धिक संपदा हक्कां’वर ऐनपूर येथे परिसंवाद रंगला

**प्रतिनिधी** | ऐनपूर

बौद्धीक संपदा हक्क म्हणजे काय? प्रत्यक्ष पेटंट नोंदणी कशी करावी? याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी समितीने आयोजित परिसंवादाला प्रतिसाद मिळाला.

‘बौद्धिक संपदा हक्क जाणीव जागृती’ या विषयावरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. सतीश वैष्णव यांनी केले. बौद्धिक संपदा हक्काची प्रासंगिकता, व्याप्ती यावर त्यांनी माहिती दिली. मुख्य वक्ते प्रा.डॉ.एस.ए.पाटील यांनी, सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात बौद्धिक संपदेविषयी सर्वसाधारण माहिती दिली. बौद्धिक संपदा आणि त्याची उदाहरणे दिली. दुसऱ्या सत्रात प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांनी बौद्धिक संपदा आणि ट्रेड मार्क विषयी माहिती दिली. ट्रेड मार्क, ट्रेडसिक्रेट, पेटंट व ट्रेडमार्क, प्रत्यक्ष पेटंट नोंदणीची माहिती दिली.

समारोप सत्रात प्रश्नोत्तरे झाली. प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी ‘बौद्धिक संपदा हक्क’ या विषयावर परिसंवाद का आवश्यक आहे? हे पटवून दिले. बौद्धिक संपदा हक्कांविषयी विद्यार्थी, संशोधक, व्यवस्थापकांमध्ये जाणीवजागृती होण्याची गरज आहे असे सांगतले. सूत्रसंचालन प्रा. प्रदीप तायडे, तर आभार डॉ.जे.पी.नेहेते यांनी मानले.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 28-03-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 17. Voting Rights and Responsibility

Our country is the largest democracy in the world, voting is very important in a democracy, so everyone must register their name in the voter list and voting is their right and duty, Dr.J.B. Anjane appealed. A program was organized on the occasion of voting. Presided over by Principal Dr. JB Anjane was. Chief Guest Prof. Dr. V.B. Suryavanshi was. At this time Prof. Hemant Baviskar gave an oath to the new voters to vote.

जळगाव तरुण भारत

Main Edition | 2024-04-05 | Page- 8
epaper.tarunbharatjalgaon.com

**मतदान करणे हा आपला हक्क व कर्तव्य - प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने**

**रावेर :** जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेला आपला देश आहे लोकशाहीत मतदान करणे खूप महत्वाचे असते म्हणून सर्वांनी मतदार यादीत आपल्या नांवाची नोंदणी करणे आवश्यक आहे तसेच मतदान करणे हा आपला हक्क व कर्तव्य असल्याचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आवाहन केले. रावेर तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदान जनजागृती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने होते. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.व्ही.बी.सूर्यवंशी होते. यावेळी प्रा.हेमंत बाविस्कर यांनी नवमतदारांना मतदान करण्याबाबत शपथ दिली. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.सतीश वैष्णव, डॉ.जे.पी.नेहते, प्रा.एस.बी.महाजन, प्रा.व्ही.एच.पाटील, डॉ.एम.के.सोनवणे, ऋषीकेश महाजन, हर्षल पाटील, गोपाल पाटील, नितीन महाजन, सहदेव पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन हेमंत बाविस्कर तर आभार डॉ.सतीश वैष्णव यांनी मानले.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 04-04-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 18. Tarikha Tera Matadan Mera

A voter awareness program was celebrated enthusiastically in College under "Tarikh Tera Matadan Mera" as per the order of Hon'ble Collector Saheb. Vice Principal Dr. Satish Vaishnav presided over the program. In this program, students of the college enthusiastically. Principal Dr. J.B. Anjane supported and guided for the success of the program

दैनिक **लोकशाही**

epaper.lokshahilive.com
10 May 2024 - Page 5



### ऐनपूर महाविद्यालयात मतदार जनजागृती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता रावेर** प्रतिनिधी

ऐनपूर येथील कला व विज्ञान महाविद्यालयात आदरणीय जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशानुसार ‘‘तारीख तेरा मतदान मेरा‘‘ अंतर्गत ऐनपूर महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ सतिश वैष्णव होते. या कार्यक्रमात तारीख तेरा मतदान मेरा या घोषणेने महाविद्यालय आवार दुमदुमला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ जे बी अंजने यांचे सहकार्य व मार्गदर्शन (पान २ वर)

### ऐनपूर महाविद्यालयात...

लाभले व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केलेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नोडल अधिकारी प्रा हेमंत बाविस्कर यांनी केले.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Page 02**

**Program Dated: 09-05-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon